**चीनला विशेष आर्थिक क्षेत्राची आवश्यकता का भासली?**

या मथळ्याचा इंग्रजी मधील लेख इंडियन एक्सप्रेस (पुणे आवृत्ती) मध्ये श्रीमती चक्रवर्ती, प्राध्यापक, चीन विषयी अभ्यास, पूर्व आशिया अभ्यासगट, दिल्ली विद्यापीठ यानी लिहला आहे. त्यांच्याकडून मला पूर्ण लेख मिळाला. त्या मध्ये चीनच्या आर्थिक क्षेत्राबद्दल सांगितलेल्या ठळक गोष्टी थोडक्यात खाली दिल्या आहेत.

१९४९ साली चीनमध्ये कमुनिस्ट राजवट स्थापन झाल्यावर प्रथम विचार सर्वांच्या प्राथमिक गरजा पुरवण्याचा झाला. जवळ जवळ सर्वांचे या बद्दल एकमत झाले. या विचाराने वाटचाल करताना आर्थिक प्रगति समाधानकारक नव्हती परंतु, सर्व जनतेच्या प्राथमिक गरजा पुरवण्यात नव्या राजवटीला यश आले. शहर तसेच खेड्यातील जनतेला, अन्न, पाणी, कपडे, निवारा, शिक्षण, आरोग्य वगैरे सोई पुरवण्यात चांगले यश आले.

माओच्या निधनानंतर १९७८ साली, आर्थिक सुधारणा वेगवान करण्याचा सत्ताधारकानी विचार केला. अन्न-निवाऱ्याचा प्रश्न सोडवल्यामुळे पुढचे लक्ष आर्थिक सत्ता हे ठरवले गेले. शेतीला या मध्ये प्राधान्य दिल गेले. १९८० सालापर्यंत खेड्या-पाड्यावर या सुधारणांची फळे दिसायला सुरवात झाली. १९९० सालापर्यंत वेगाने प्रगती झाली व खेड्यांची स्थिती खूप सुधारली. १९९२ साली १४ व्या कम्युनिस्ट कॉंग्रेस मध्ये चीनच्या समाजवादाला बाजाराची जोड देण्याचा ठराव संमत झाला. या ठरावानुसार चीन मध्ये भांडवलशाहीचा शिरकाव झाला. वेगाने प्रगती हे लक्ष ठरवल्यामुळे भांडवलशाहीचे वावडे राहिले नाही. परंतु, भांडवलशाही कम्युनिस्ट विचारसरणीत बसत नसल्याने विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण करण्यात आली. या क्षेत्रात भांडवलशाही व इतरत्र कस्युनिझम अशी विभागणी करण्यात आली. भांडवलशाहीचा स्वीकार केल्यामुळे चीनची लक्षणीय प्रगती झाली. विकासवेग अविश्वसनिय राहिला. परंतु, त्या मुळे खेड्यांची स्थिती दयनीय झाली. ८०% खेडूताना रोजगार मिळेनासा झाला. ज्याना मिळाला त्याना तो पोटापाण्याला अपुरा ठरला. शहरे (भांडवलशाही क्षेत्र) व खेडी (कस्युनिस्ट क्षेत्र) या मध्ये दरी निर्माण झाली व वाढत गेली. प्रांता-प्रांतातील विकासामध्ये असमतोल निर्माण झाला.

चीनमध्ये विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण करण्याकरता आणखीही कांही कारणे होती. स्वातंत्र्य पूर्व काळात भांडवलदार व साम्राज्यवादी राष्ट्रानी चीनवर दढपण आणून त्यांचा माल चीनमध्ये विकण्याकरता दरवाजे उघडण्यास भाग पाडले होते. पूर्व किनाऱ्यावरील कांही बंदरे केवळ चीन मध्ये माल पाठवण्याकरता विकसित केली होती. ही बंदरे सुद्धा 'विशेष आर्थिक क्षेत्र' सदृश होती. कम्युनिस्ट विचारसरणीमुळे चीन मध्ये परदेशी गुंतवणुकीला मज्जाव होता. परंतु, नवीन राजवटीने ओळखले की, गुंतवणुकी विना आर्थिक प्रगती अशक्य आहे व अशी गुंतवणुक फक्त परदेशी भांडवलातुनच होऊ शकते. आणखी एक आवश्यकता चीनी नेत्यानी ओळखली. हॉंगकॉंग व मॅकॉव शहराशी संपर्क. असा संपर्क साधण्याकरता व परदेशी गुंतवणुक आकर्षित करण्याकरता चीनला 'विशेष आर्थिक क्षेत्रांची' नितांत आवश्यकता आहे.

चीनी नेत्याना आशा आहे की, हॉंगकॉंग, मॅकॉव व तैवान हे पुन्हा चीनचे भाग बनतील. प्रमुखपणे तैवान, 'विशेष आर्थिक क्षेत्रा' मुळे चीनमध्ये सामील होण्यास तयार होईल अशी त्यांची अपेक्षा आहे. 'विशेष आर्थिक क्षेत्रा' चे आणखी एक लक्ष आधुनिक तंत्रज्ञानाची आयात, अभ्यास, व चीनच्या परिस्थिती प्रमाणे अनुकुल बनवणे. हे उदिष्ट साध्य करण्याकरता चीनने, कॅसिनो, वेश्यागृहे वगैरे ही बनवण्यास मागे पुढे पाहिले नाही. त्यांच्या मते परदेशी गुंतवणुक व प्रवाशाना आकृष्ठ करण्यास हे आवश्यक आहे. सध्या तर जवळ जवळ चीनचा पूर्व भाग पूर्णपणे 'विशेष आर्थिक क्षेत्रा' नी व्यापला आहे, जणु कांही तो संपूर्ण भाग एक 'विशेष आर्थिक क्षेत्र' बनला आहे.

थोडक्यात सांगायचे म्हणजे कमुनिस्टांच्या तत्व प्रणालित परदेशी गुंतवणुक बसत नसल्यामुळे व आर्थिक प्रगति महासत्ता बनण्यास आवश्यक असल्यामुळे चीनला 'विशेष आर्थिक क्षेत्रा' ची गरज भासली. अशा प्रकारे

दुतोंडी अर्थ व्यवस्था चीनने स्वीकारली. यामुळे मोठी शहरे घडली परंतु खेड्यातील लोक देशोधडीला लागले, चीनला आपली संस्कृती बदलावी लागली, चीनी स्त्रियाना परदेशी भांडवलदारांची सेवा करावी लागत आहे. एकदा महात्मा गांधी म्हणाले होते 'पाश्च्यांच्या पद्धतीची सुधारणा आणण्या करता भारताला पृथ्वीच्या सातपट प्रदेश गुलाम बनवावा लागेल.' चीन स्वतःचा भूभाग दोन हिश्यात वाटून छोट्या भागामध्ये भरभराट व मोठ्या भागात दारिद्य आणत आहे. खेड्यांची स्थिती दयनीय होत आहे.पुढच्या भागात भारतामध्ये 'विशेष आर्थिक क्षेत्रा' ची आवश्यकता आहे काय? व ती क्षेत्रे कशी असावीत यावर विचार करु.

**भारतामध्ये 'विशेष आर्थिक क्षेत्रा' ची आवश्यकता व ती क्षेत्रे कशी असावीत.**

भारताने आपले लक्ष सर्वप्रथम ठरवले पाहिजे. चीनने अतिजलद आर्थिक सुधारणा हे आपले लक्ष ठरवले व नैतिकतेला फाटा दिला. चीनी कमुनिस्ट स्वागत करण्यात अगत्य दाखवतील त्याच बरोबर पाठीत खंजिर खुपण्यास त्याना गैर वाटणार नाही. चीन आर्थिक प्रगतीचे उदिष्ठ साध्य झालेवर, लष्करी प्रभुसत्ता झाल्यावर परदेशी गुंवणुकीचे राष्ट्रियकरण करण्यास मागे पुढे पाहणार नाहीत. भारतामध्ये परदेशी गुंतवणुकीला मज्जाव नाही. भारताने कधीही कोणाचा विश्वासघात केला नाही. नैतिकतेला भारतामध्ये महत्त्व दिले जाते. अशा परिस्थितीत चीनचे अंधानुकरण भारताला परवडणारे नाही. भारताने आपला मार्ग शोधला व अनुसरला पाहिजे.

लोकांच्या स्थलांतरामुळे खूप समस्या निर्माण होतात. याचा अनुभव आपण घेतला आहे. दिल्ली घ्या अगर मुंबई, अथवा कोलकता किंवा चेन्नई, वा बंगळूर, थोडक्यात कोठलेही शहर घ्या. तेथील समस्यांचे मूळ 'लोकांचे स्थलांतर' हेच आहे. या मुळेच लोकांचे व शहरांचे आरोग्य बिघडले आहे. शहरे मृत्युमुखात ढकलली जात आहेत. ही शहरे वाचवण्याकरता प्रचंड गुंतवणुक तरी केली पाहिजे अथवा लोकांचे लोंढे थोपवले पाहिजेत. दुसऱ्या बाजुला खेडी सुधारण्याकरता अल्प गुंतवणुकीची आवश्यकता आहे. हे करावयाचे झाले तर 'कारखाने खेड्यात नेले पाहिजेत' जेथे लोक तेथे कारखाने हा आपला मंत्र झाला पाहिजे. लोकाना हलवण्या ऐवजी कारखान्याना हलवले पाहिजे. निदान नविन कारखाने खेड्यात नेले पाहिजेत. सध्या दळण वळण सुधारण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. विचार करा परदेशी गुंतवणुक भारत किंवा चीन मध्ये का येत आहे? आपल्या कडे उपलब्ध असणारे मनुष्यबळ हेच यांचे कारण आहे. जरी 'तयार वस्तु' विकुन जास्त नफा मिळत असला तरी पाश्यात्य देश आपल्याकडे कारखाने काढत आहेत. कारण, त्यांचेकडे मनुष्यबळ कमी आहे. येथील लोकाना स्वतःच्या देशात नेऊन त्याना हा प्रश्न सोडविता आला असता. परंतु त्या करता, येणाऱ्या भविष्यात किती तरी जास्त किंमत मोजावी लागेल. आपण हे समजुन घ्यावयास का तयार नाही? गरिबांचे दुःख समजण्याची आपली क्षमता शून्य झाली काय? निदान पाश्यचात्य आपले कारखाने मनुष्यबळाच्या ठिकाणी नेत आहेत म्हणून तरी आपण खेड्यात कारखाने नेऊ या.

सध्या प्रगती पेक्षा राजकारणाला अग्रता मिळत आहे. राष्ट्रहिता पेक्षा स्वहिताला प्राधान्य मिळत आहे.'विशेष आर्थिक क्षेत्रा' चे गोडवे गाणारे व त्या विरुद्ध बोटे मोडणारे या दोन्ही गटांचे विचार स्वार्थीच आहेत. श्रीमंत विसरतात की झोपडपट्टीत ताजमहाल बांधता येत नाही. त्या करता निदान मातीची घरे झोपडपट्टीत प्रथम बांधली पाहिजेत. बोटे मोडणारे फक्त जमीनीला किति भाव मिळतो ते पाहतात. दोन्ही गट देशाच्या उन्नती बाबत उदाशीन आहेत. कांही राजकारण्याना ही क्षेत्रे चीन मध्ये आहेत म्हणून आपल्याकडेही असावित असे वाटते. ती भारतामध्ये योग्य आहेत काय याचा विचार करण्याची त्यांची तयारी नाही. कांहीना यातून पैशाच्या रुपाने (त्याना व त्यांच्या पक्षाला) मिळणारा लाभ दिसतो. यातून हेच दिसते की, भारताला लाभदायक ठरण्याकरता त्या मध्ये काय व कसे बदल करावे याचा विचारच झाला नाही.

माझ्या मते भारतामध्ये खेड्यांची सुधारणा करणे आवश्यक व वाजवी आहे. त्याकरता खालील योजना राबवाव्यात.

1. उत्तम प्रतिचे विशाल महामार्ग, रेल्वेमार्ग, विमानतळ, औद्योगिक वीजवाहिन्या, पाणी पुरवठा, बिनतारी माहिती दळण वळण सुविधा वगैरे खेड्या पर्यंत पोहचवाव्यात. दुष्काळी भागाना प्राथमिकता द्यावी.
2. रस्त्याच्या दोन्ही बाजुला ५०० मिटरचा पट्टा उद्योग, व्यापार, निवास, सुविधा केंद्रे वगैरे करता राखून ठेवावा. त्या करता विशिष्ट अंतरे निर्धारित करावित
3. साधारणपणे प्रत्येक ५ कि. मी. अंतरावर निवास क्षेत्र, १० कि.मी. अंतरावर व्यापार केंद्रे व सुविधा केंद्रे, दर ५ कि. मी. अंतरावर रेल्वे स्टेशन, दर १०० कि. मी. अंतरावर विमानतळ व राहिलेल्या जागेत कारखाने, असावेत. या पट्ट्यात ज्या प्रकारच्या बांधकामाना परवानगी असेल तशा बांधकामाना या पट्ट्याच्या बाहेर परवानगी नसावी.

हे करण्याकरता खालील तत्वे वापरावीत.

1. रेल्वे व रस्त्याकरता १०० मिटर रुंद जागा ठेवावी.
2. आरक्षित केलेल्या पट्ट्यत ज्यांची जमीन असेल त्याना त्याच जागी पुनःस्थापित करावे. त्या करता १० पट जागा विचारात घेऊन जागेचे पुनर्वाटप करावे. (असे करण्यास कोणाचा आक्षेप नसेल कारण यामुळे जमीनीच्या किंमतीत किती तरी पट वाढ होईल. शासनाला रस्त्याला लागणाऱ्या जमीनीचा मोबदला द्यावा लागणार नाही.) तसेच त्याना ५० चौरस मिटरचे घर बांधून द्यावे. जो खर्च येईल तो जमीनीची किंमत देताना त्यातून वजा करावा
3. पुनर्वाटप केलेली जमीन सध्याच्या मालकाने थेट विकावी. शासनाने ताब्यात घेऊन विकू नये.
4. जमीनीची किंमत रोख न देता भाग ('शेअर्स') रुपात द्यावी.
5. ज्या गांवातील जमीन घेतली जाईल त्या गांवातील सर्वांना प्रशिक्षण देऊन उद्योगानी नोकऱ्या द्याव्यात.
6. शेती संबधातील उद्योगाना प्राधान्य द्यावे.
7. फक्त अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणाऱ्या उद्योगानाच परवानगी द्यावी.
8. पाश्यात्य देशात मोडीत काढलेल्या तंत्रज्ञानावर आधारित उद्योगाना बाहेरची वाट दाखवावी.
9. परदेशी गुंतवणुक आकर्षित करण्याकरता कसलेही कर आकारु नयेत. १० वर्षा नंतर मात्र उद्योगानी दर वर्षी १० टक्के भाग (शेअर्स) त्यांच्या कामगाराना मोफत द्यावेत.
10. जेथे जेथे व जेंव्हा जेंव्हा मनुष्यबळाची आवश्यकता उपलब्धे पेक्षा वाढेत तेथे नवीन कारखाने अथवा विस्तारी करणा करता परवानगी देऊ नये.
11. पायाभूत सोई करता जो खर्च येईल तो जमीनीच्या हस्तांतरावर कर लाऊन वसूल करावा.

या मध्ये आणखीही धोरणांचा अंतर्भाव करता येईल. लक्षापासून विचलित मात्र होऊ नये.